MHRG030013432023

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | – | १०.०८.२०२३ |
| नोंदणी दिनांक | – | ११.०८.२०२३ |
| निकाल दिनांक | – | ०३.०८.२०२६ |
| कालावधी – ०२ व. ११ म. २४ दि. | | |

**तक्ता क्र. ३२**

**भाग 'अ'**

(प्रकरण ६, परिच्छेद ४४ (एक), फौजदारी नियम पुस्तीका)

<table>
<tr><td rowspan="2"></td><td colspan="2"><u>मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग यांचे न्यायालयात</u><br>(पिठासीन अधिकारी – डी.एम.झाटे)<br>(न्यायनिर्णय दिनांक ०३.०८.२०२६ रोजीचा)<br><br>नियमीत फौजदारी खटला क्र. १४०/२०२३<br>नि.क्र. ५१/ब</td></tr>
<tr><td colspan="2">रेवदंडा पोलीस ठाणे येथील गुन्हा नोंद क्र. ११३/२०२३ भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये</td></tr>
<tr><td>अभियोगपक्ष</td><td></td><td>महाराष्ट्र शासनमार्फत<br>रेवदंडा पोलीस ठाणे</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री. पी.एस.पाटील | |
| आरोपी | | १. | पांडुरंग गणपत टिवळेकर, वय ४४ वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | २. | जितेंद्र गणपत टिवळेकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | ३. | दिपक गणपत टिवळेकर, वय ४० वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | ४. | **आदिनाथ गणपत टिवळेकर (मयत)** |
| | | ५. | प्रमिला जितेंद्र टिवळेकर, वय ५० वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | ६. | करुणा पांडुरंग टिवळेकर, वय ३५ वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | ७. | अलक्षा दिपक टिवळेकर, वय ३३ वर्षे, व्यवसाय – मासेमारी, रा. थेरोंडा आगळ्याची वाडी, ता. अलिबाग, जि. रायगड |
| विधिज्ञ | | आरोपींतर्फे श्री. पी.पी.पाटील | |

**भाग 'ब'**

(प्रकरण ६, परिच्छेद ४४ (दोन), फौजदारी नियम पुस्तिका)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०४.०५.२०२३ |
| फिर्याद दाखल तारीख | ०४.०५.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १०.०८.२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०२.११.२०२३ व ३१.०७.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १०.०६.२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | ०३.०८.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, जर शिक्षा झाली असेल तर | -- |

| **आरोपी अ.क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक केल्याची तारीख** | **जामीन झाल्याची तारीख** | **कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले** | **शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त** | **काय शिक्षा दिली** | **फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पांडुरंग गणपत टिवळेकर | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०२.११. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, | निर्दोष मुक्त | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये | | | |
| २ | जितेंद्र गणपत टिवळेकर | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०२.११. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ३ | दिपक गणपत टिवळेकर | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ४ | आदिनाथ गणपत टिवळेकर | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०२.११. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये | **मयत** | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रमिला जितेंद्र टिवळेकर | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०२.११. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ६ | करुणा पांडुरंग टिवळेकर | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०२.११. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ७ | अलक्षा दिपक टिवळेकर | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०२.११. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |

# <u>न्यायनिर्णय</u>

(जाहीर दिनांक ०३.०८.२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये आरोप निश्चित करुन खटला चालविणेत आला आहे.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे,

फिर्यादी नितीन रामकृष्ण बळी, वय ४८ वर्षे, व्यवसाय–मासेमारी, रा. आगळ्याची वाडी, थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील रहिवासी आहे. दिनांक ०४.०५.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता फिर्यादीचा भाऊ कपिल रामकृष्ण बळी याच्या घराच्या भिंतीचे काम थेरोंडा आगळ्याची वाडी येथे सुरु होते. सदर घराची भिंत बांधत असताना त्या बांधकामाच्या सामाईक भिंतीला लागून शेजारी असलेले आरोपी क्र. १ ते ७ व विधिसंघर्षित बालक कावेरी जितेंद्र टिवळेकर यांनी 'तुम्ही भिंतीचे बांधकाम करु नका, तुमचे डोळे फुटले का, तुमच्या बापाची जागा आहे का' अशी शिविगाळी करुन फिर्यादी, त्याचे वडील रामकृष्ण व भाऊ कपिल या तिघांना आरोपी क्र. १ पांडुरंग याने हातातील फावड्याने आणि इतर आरोपी यांनी काठ्यांनी हातापायावर व डोक्यावर मारहाण करुन दुखापत केली. तसेच, भावजय सुचिता हिला आरोपी क्र. १, ५ व ६ यांनी मारहाण करुन तिचे डोके भिंतीला आपटून दुखापत करुन तिच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडून तिचे नुकसान केले. त्यानंतर फिर्यादीने रेवदंडा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने रेवदंडा पोलीस ठाणे येथे आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिताचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये गुन्हा रजि.नं. ११३/२०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक डी.जे.म्हशिलकर यांनी केला. त्यांनी वरील गुन्हयाचा तपास करुन तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा आढळून आल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये निशाणी १२ कडे दोषारोप निश्चित केले व ते आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितले असता त्यांनी दोषारोप नाकारुन खटला चालवण्याची तयारी दर्शवली. आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण चार साक्षीदार तपासले आहेत. आरोपींविरूद्ध कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला नाही. प्रस्तुत खटल्याच्या सुनावणीदरम्यान दिनांक ०४.०७.२०२५ रोजी आरोपी क्र. ४ आदिनाथ गणपत टिवळेकर मयत झाले असून त्याचे मृत्यू प्रमाणपत्र नि.क्र. ५० कडे दाखल केले आहे. त्यामुळे त्याच्याविरुध्द खटला कमी करण्याचा आदेश नि.क्र. १ वर करण्यात आला.

५. सरकारपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पी.एस.पाटील आणि आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. पी.पी.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार करता या प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | मौजे आगळ्याची वाडी, थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथे आरोपींनी फिर्यादी नितीन रामकृष्ण बळी याच्या घराजवळ समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे घटक झाल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| २. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता दंगा केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| ३. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता प्राणघातक हत्यारांनी सज्ज होऊन दंगा केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| ४. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदारांना फावडा व लाकडी काठीसारख्या घातक हत्याराने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| ५. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदारांना हाताबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदारांना अपमानास्पद भाषेत शिविगाळी करुन ते सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास उद्युक्त होतील असे कृत्य केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| ७. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता सुचिता कपिल बळी हिचे रक्कम रु. ५०/– पेक्षा अधिक रकमेचे नुकसान केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| ८. | अंतिम आदेश काय ? | – | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ७ करीता</u>** –

वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यावरील निष्कर्ष एकत्रात देत आहे.

६. फिर्यादी नितीन रामकृष्ण बळी, त्याचे वडील व भाऊ यांच्यासह घराच्या भिंतीचे बांधकाम करत असताना आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर

जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदारांना फावडा व लाकडी काठीसारख्या घातक हत्याराने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवल्याचा, फिर्यादी व साक्षीदारांना हाताबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवल्याचा, तसेच त्यांना अपमानास्पद भाषेत शिविगाळी करुन सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास उद्युक्त केल्याचा तसेच, सुचिता कपिल बळी हिचे रक्कम रु. ५०/– पेक्षा अधिक रकमेचे नुकसान केल्याचा आरोप शाबित करण्याकरीता अभियोगपक्षाने एकूण चार साक्षीदारांना तपासले आहे.

७. नितीन (अ.सा. १) याच्या पुराव्यावरुन दिनांक ०४.०२.२०२३ रोजी ते घरी असताना घरासमोर आरडाओरडा चालू होता म्हणून ते बघायला गेले होते आणि तेथे लोकांची बाचाबाची झाली त्यावेळी ते खाली पडून जखमी झाले. याबाबत त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. परंतु, त्यांनी आरोपींविरुध्द गैरसमजूतीतून फिर्याद दाखल केल्याचे ते सांगतात. कपिल (अ.सा. २) सांगतात की, दिनांक ०४.०२.२०२३ रोजी त्यांच्या दाराजवळ लोक जमले होते व त्यांना पाहायला ते गेले असता ते व त्यांचे वडील खाली पडून जखमी झाले. रामकृष्ण (अ.सा. ३) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घराच्या वादावरुन गोंगाटा झालेवरुन ते बघायला गेले असता त्यांच्या हाताला दुखापत झाली. सुचिता (अ.सा. ४) यांच्या पुराव्यावरून कोणतीही घटना घडली नसल्याचे ते सांगत असल्याचे दिसून येत आहे.

८. फिर्यादी व साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला असता त्यांनी अभियोगपक्षाची केस नाकारली आहे. परंतु, कपिल (अ.सा. २) याने उलटतपासात मान्य केले आहे की, त्यांचे व आरोपींचे न्यायालयाबाहेर आपसात

प्रकरण मिटले आहे म्हणून त्यांना प्रस्तुतची केस मागे घ्यायची आहे. आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना काठ्या व फावड्याने मारहाण करुन शिविगाळी केल्याचे व आरोपींनी मारहाण केल्यामुळे त्याने फिर्याद दाखल केली होती याबाबत ते काही सांगत नाहीत.

९. बचावपक्षाने घटनास्थळ पंचनामा (नि.क्र. ४५) आणि वैद्यकिय प्रमाणपत्र (नि.क्र. ४६ ते ५०) मान्य केले आहे. त्यावरुन नितीन (अ.सा. १), कपिल (अ.सा. २) व रामकृष्ण (अ.सा. ३) यांना साधी दुखापत झाल्याचे व घटनास्थळ आगळ्याची वाडी, थेरोंडा येथील अनंत गजानन मुंबईकर यांच्या घरासमोर असल्याचे दिसून येत आहे. परंतु, फिर्यादी अथवा इतर साक्षीदार आरोपींविरुध्द काही सांगत नाहीत.

१०. एकंदरीत अभिलेखावरील पुरावा विचारात घेतला असता आरोपींचा गुन्हयाशी संबंध जोडणारा कोणताही पुरावा अभियोगपक्षाने सादर केलेला नाही. अभिलेखाचे अवलोकन करता फिर्यादी व आरोपींची आपसात तडजोड झाल्याचे दिसते. त्यामुळे प्रस्तुतच्या खटल्यामध्ये आरोपींवर ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहितेचे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वयेचे दोषारोप पुराव्याअभावी अभियोगपक्षाने शाबित केले नाहीत. म्हणून मुद्दा क्र. १ ते ७ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ८ करीता</u> –**

११. आरोपींनी भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ अन्वये अपराध केल्याचे अभियोगपक्षाने

पुराव्याअभावी शाबित न केल्यामुळे ते सर्व निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. जप्त मुद्देमाल एक लोखंडी फावडा याला लोखंडी पाते असल्याने सदर फावड्याची जाहीर लिलावाद्वारे विक्री करुन आलेली रक्कम सरकारजमा करण्याबाबत तसेच, उर्वरित जप्त मुद्देमाल लाकडी काठ्या मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्याबाबत आदेश करणे योग्य होईल. करीता मुद्दा क्र. ८ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १) पांडुरंग गणपत टिवळेकर, क्र. २) जितेंद्र गणपत टिवळेकर, क्र. ३) दिपक गणपत टिवळेकर, क्र. ५) प्रमिला जितेंद्र टिवळेकर, क्र. ६) करुणा पांडुरंग टिवळेकर, क्र. ७) अलक्षा दिपक टिवळेकर यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ४२७ सहकलम १४९ नुसार केलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल फावडा जाहिर लिलावाद्वारे विक्री करुन आलेली रक्कम सरकारजमा करण्यात यावी.

४. उर्वरित जप्त मुद्देमाल लाकडी काठ्या मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात याव्यात.

५. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ मधील तरतुदीप्रमाणे प्रत्येकी रक्कम रूपये १५,०००/– चा जामीन द्यावा.

DATTA MADHUKARRAO ZATE

Digitally signed by DATTA MADHUKARRAO ZATE
Date: 2026.08.03 18:28:38 +0530

अलिबाग, (डी.एम.झाटे)

दिनांक – ०३.०८.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग

# सूची–१

## भाग–क

(प्रकरण ६, परिच्छेद ४४ (तीन), फौजदारी नियम पुस्तीका)

**अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे साक्षीदार /न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोगपक्ष –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र. १ | नितीन रामकृष्ण बळी | फिर्यादी | ३९ |
| सा.क्र. २ | कपिल रामकृष्ण बळी | जखमी साक्षीदार | ४० |
| सा.क्र. ३ | रामकृष्ण गोमा बळी | जखमी साक्षीदार | ४१ |
| सा.क्र. ४ | सुचिता कपिल बळी | जखमी साक्षीदार | ४२ |

**ब. आरोपी साक्षीदार, जर असेल तर –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयाचा साक्षीदार, जर असेल तर –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

# निशाण्यांची यादी

## अ. अभियोगपक्ष –

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४५ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ४६ ते ४८ | वैद्यकिय प्रमाणपत्रं |

## ब. आरोपीपक्ष –

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## क. न्यायालयाची निशाणी –

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## ड. महत्वाच्या बाबी –

| अ.क्र. | महत्वाच्या बाबी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

DATTA MADHUKARRAO ZATE
Digitally signed by DATTA MADHUKARRAO ZATE
Date: 2026.08.03 18:28:47 +0530

अलिबाग, (डी.एम.झाटे)
दिनांक – ०३.०८.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग